पिंपरी चिंचवडमहानगरपालिका
फ क्षेत्रीय कार्यालय, निगडी-44
क्र.-फक्षेका/सभा/कावि/06/2019
दिनांक -27/02/2019

**प्रति,**

मा.------------------------------------

सदस्य,पिंपरी चिंचवड महानगरपालिका

निगडी – 411044

विषय – पिंपरी चिंचवड महानगरपालिकेची मा.फ प्रभाग समितीची मासिक सभा मंगळवार दिनाक 05/03/2019 रोजी सकाळी11.30 वाजता आयोजित केलेबाबत.

महोदय / महोदया,

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेची मा. फ प्रभाग समितीची मासिक सभा मंगळवार दिनांक 05/03/2019 रोजी सकाळी 11.30 वाजता फ क्षेत्रीय कार्यालयातील **"राजर्षीशाहु महाराज सभागृहात"** आयोजित करणेत आली आहे. सोबत सभेची कार्यपत्रिका जोडली आहे. तरी आपण सभेस उपस्थित रहावे, ही विनंती.

आपली विश्वासू ,

प्रशासन अधिकारी
तथा
सचिव (सभाशाखा)
फ प्रभाग समिती
पिंपरी चिंचवड महानगरलिका

प्रत – 1.संबंधित शाखाप्रमुख / विभागप्रमुख------------------------ विभाग
2.कार्यालयीन नोटिस बोर्ड

Scanned with CamScanner

**पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी 411018**
**मा. फ प्रभाग समिती**
**कार्यपत्रिका क्रमांक - 14**

दिनांक:- 05/03/2019 वेळ. सकाळी 11.30 वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या फ प्रभाग समितीची मासिक सभा मंगळवार दि.05/03/2019 रोजी सकाळी 11.30 वाजता फ क्षेत्रीय कार्यालयातील "राजर्षीशाहु महाराज सभागृहात" आयोजित करणेत आली आहे. सदर सभेस खालीलप्रमाणे कामकाज होईल.

अ) दि. 12/02/2019 रोजी झालेल्या मासिक सभेचा सभावृत्तांत (कार्यपत्रिका क्रमांक 12 व विशेष सभा क्रमांक 13 कायम करणे.

विषय क्रमांक 1.फ क्षेत्रीय कार्यालयाच्या कार्यक्षेत्रात हॉकर्स झोनचे निश्चित केलेल्या ठिकाणास नेमणेत आलेल्या उपसमिती प्रत्यक्ष स्थळपाहणी करुन हॉकर्स ठिकाणे निश्चित करणेत आलेली आहेत. सदर ठिकाणांना मा.प्रभाग समितीची मान्यता घेणेत येऊन सदरचा विषय शहर फेरीवाला समितीकडे अंतिम मान्यते कामी सादर करावयाचा असल्याने मान्यता देणेबाबत विचार करणे.

(सोबत हॉकर्स झोन निश्चित केलेल्या ठिकाणांची प्रभागनिहाय यादी.)

(दिनांक 5/3/2019 चे सभेत घेणेचे निर्णयाप्रमाणे )

विषय क्रमांक-2 - फ क्षेत्रीय कार्यालयांतर्गत प्रभाग क्र. ११ मधील विविध प्रकल्पांचे नामकरणाबाबत मा. फ प्रभाग समिती ठराव क्र. 19 दि. 04/12/2018 अन्वये सन्मा. प्रभाग समिती सदस्यांमार्फत ठेवलेला विषय सर्वानुमते मान्य करणेत आलेला असुन सदर ठरावान्वये घरकुल प्रकल्प कमान (प्रवेशद्वार) – 1) लोकनेते गोपीनाथ मुंडे नगर 2) समस्त नेवाळे मळा प्रवेशद्वार असे नामकरण करणेस मान्यता देणेत आलेली आहे.

फेडरेशन ऑफ घरकुल सहकारी गृहरचना संस्था मर्या. चिखली,भारिप बहुजन महासंघ व संविधान दिन सोहळा समिती.चिखली यांनी दि. 07/01/2019 चे पत्रानुसार घरकुल प्रकल्प कमानचे नामकरणास विरोध दर्शविला आहे.

दिनांक 23/01/2019 रोजी आपले सरकार वेबपोर्टलवर पिंपरी चिंचवड महानगरपालिकेने केलेला ठराव दुरुस्त करुन घरकुलचे नामकरण हे प्रचलित नावाप्रमाणेच घरकुल नवनगर संकुल करण्यात यावे अशी तक्रार दाखल केली आहे.

तसेच भगवानबाबा प्रतिष्ठाण-मोरवाडी, जयभगवान महासंघ-पिंपरी व पिंपरी चिंचवड परिवर्तन पार्टी, पिंपळे गुरव यांनी दि. 16/01/2019 व 21/01/2019 चे पत्रान्वये घरकुल प्रकल्पाचे "स्व. गोपीनाथ मुंडे नगर" नामकरण करणेबाबत समर्थन केलेले आहे.

उपरोक्त नमुद केलेप्रमाणे काही संस्थांनी विरोध दर्शविला असून काही सस्थांनी सहमती दर्शविलेली आहे. तरी सदरचा घरकुल नामकरणा बाबतचा विषय नजीकच्या मा.प्रभाग समिती सभेमध्ये अवलोकनार्थ सादर करणेत यावा.

(प्रशासन विभागाकडील पत्र क्रमांक फक्षेका /1/कावि/125/2019 दिनांक 01/02/2019)

विषय क्रमांक -3. मा.सभापती यांचे परवानगीने येणारे ऐनवेळचे विषय.

प्रशासन अधिकारी
तथा
सचिव (सभाशाखा)
फ क्षेत्रीय कार्यालय
पिंपरी चिंचवड महानगरलिका

पिंपरी चिंचवडमहानगरपालिका
फ क्षेत्रीय कार्यालय, निगडी
क्र फक्षेका/सभा/कावि/06/2019
दिनांक -27/02/2019

Scanned with CamScanner